Telephone no -020-26123066/67 Email: mscepune@gmail.com Website:www.mscepune.in

प्रसिध्दी निवेदन
परीक्षा प्राधान्य

क्र.मरापप/NMMS/2016-17/स-3/4953
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1.
दिनांक : 03 /08/2016

प्रति,

**मा. महासंचालक,**
माहिती जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, तळमजला,
मुंबई- 400 032.

**विषय:** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना
परीक्षा (NMMS) 2016-17. परीक्षा दिनांक 20 नोव्हेंबर 2016.

महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत राष्ट्रीय आर्थिकदृष्टया दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा 2016-17 **चे आयोजन इ. 8 वी मधील विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक 20 नोव्हेंबर 2016** रोजी करण्यात येणार आहे. त्यासंबंधी प्रसिद्धी पत्राची (इंग्रजी व मराठी) प्रत सोबत जोडलेली आहे.

महाराष्ट्रातील आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थी शोधण्याच्या दृष्टीने या परीक्षेचे महत्व अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शनवरुन तसेच लोकराज्य मासिकामधून या परीक्षेच्या प्रसिद्धीपत्रकास विनामूल्य प्रसिद्धी देण्यात यावी अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

3/8
(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

**अ) प्रत माहितीसाठी सादर :**

1) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32.
2) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, सेनापती बापट मार्ग, बालभारती, पुणे 411004.
3) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, 1 ला मजला, जुना आग्रा रोड, नाशिक 422 002.
4) मा. आयुक्त, समाजकल्याण विभाग, 3 चर्च रोड, GPO जवळ, पुणे-1.
5) मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे-1.
6) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, शिक्षक भवन, पुणे30.
7) मा. अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, आगरकर रोड, एरंवणा, पुणे 411004.
8) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - 30
9) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, 17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे1.
10) मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाषचंद्र बोस रोड, मुंबई

**ब) प्रत माहिती व कार्यवाहीस्तव सादरः-**

1) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई 400 025 कृपया या निवेदनास त्वरीत प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.
2) मा. संपादक, "शिक्षण संक्रमण" माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे-5 कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
3) मा. संपादक " जीवन शिक्षण " महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
4) मा. संपादक दै. ------------------ कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय दैनिकातून बातमी स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.
5) मा. व्यवस्थापक, ------------------ न्यूज चॅनल कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय चॅनलवरुन बातमी स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

**क) प्रत माहिती व कार्यवाहीस्तवः-**

1. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
2. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ________________
3. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व जिल्हा परिषदा व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (पश्चिम/दक्षिण/उत्तर) यांना त्वरीत कार्यवाहीसाठी.
4. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व जिल्हा परिषदा

# NATIONAL MEANS CUM-MERIT SHOLARSHIP SCHEME (NMMS) 2016-17

National Means - Cum- Merit Scholarship Scheme is a flagship activity of the NCERT New Delhi started in the year 2007-08. The purpose of the scheme is to identify talented students in Economical Backward group and nurture their talent. Talent refers to the potentiality that manifests itself in a high level of performance in one of more specialized areas. It honors and helps talented student by providing financial assistance in the form of a monthly Scholarship this assistance is provided up to XII$^{th}$ level.

On the basis of the examination conducted, scholarships will be awarded for whose parents having income less than Rs. 1, 50,000/- appearing for class VIII who have got 55% marks in VII$^{th}$ STD. (for reserve candidate 50%) and studying in recognized schools only. **Student studying in non recognized school are not eligible.**

1) **Scholarship:** Awardees of NMMS Scheme will receive a sum of **Rs.** 500/- per month as per NCERT rules / Department of Human Research of central Government.
2) **Selection:** There will be selection process for award of scholarship. Selection will be done by States / UTs through written examination students who qualify for the NMMS Scheme.
3) **Important Dates:** Dates for submission of Applications Forms by concerned school to Education Inspector / Education officer is 31$^{st}$ August, 2016.

| Stage | Area | Dates |
|---|---|---|
| **Stage I** (State) | a) Last Date for Submission of online Application Form by school. | 31$^{st}$ August, 2016 |
| | b) School to Education officers in Maharashtra | As per schedule given by Education officers |
| | c) Last Date for Submission of late online application form by school | 30$^{th}$ September, 2016 |
| | Examination in **Maharashtra →** | 20$^{th}$ November, 2016 ( Sunday ) |

4) **Eligibility:** Students who have passed VII$^{th}$ STD with 55% marks (Reserve Candidates 50 %) & studying in class VIII$^{th}$ in recognized schools of **Government, Government Aided and Local bodies only are eligible** to appear for the NMMS examination conducted by the State in which the schools are located. Total Annual income of parents should be below Rs. 1,50,000/-) Caste Certificate, Income certificate disability certificate should be given by Tahasildar / proper authority / Talathi. **The students studying in Kendriya Vidyalayas and Jawahar Navodaya Vidyalayas are not entitled to get scholarship under this scheme. Similarly those students studying in Residential schools run by the State Government Institutions where facilities like boarding, lodging and**

**education are provided, and students studying in private schools are also not eligible for the scholarship under the scheme.**

5) **Examination:** The pattern of written examination will comprise two parts, namely **(a) Mental Ability Test (MAT) and (b) Scholastic Aptitude Test (SAT)** covering social sciences, science and mathematics.

6) **Quota** - Each state/ Union Territory has been allotted a quota to recommend a specific number of candidates. The details of which will be made available on NCERT website. The scholarships percentage will be allotted as per state caste wise reservation as follows.

   1) SC - 13.00  2) ST- 07.00  3) VJ - 03.00  4) NTB - 02.50

   5) NTC – 3.50  6) NTD – 2.00  7) OBC - 19.00  8) SBC - 02.00

   There will be also 3% reservation for disables in each caste category. The Scholarship will be distributed according to quota to each district & caste category.

7) **Application Forms:** In Maharashtra online application forms will be available to schools from Dt. 03/08/2016 on the MSCE website www.mscepune.in, S.B.I. challans will be also available on website. Only school authority shall fill the online forms and 'S' forms. Printout of all online forms, along with attested copies of caste, disability and income certificates. duly signed by student, parent & head master, 'S' forms print out signed by Head Master of school and SBI Challan (amount deposited in favour of MSCE) are to be submitted by school to the respective Education Officer / Educational Inspectors by **31st August, 2016.**

8) **Fees:** The examination fee per student is Rs. 100/- and affiliation fee of Rs.200/- per academic year per institution is required. (only through school by SBI challan)

9) **Announcement of Results:** Results of the NMMS examination will be announced by the respective State Governments.

**Disclaimer:** NCERT / Maharashtra State Council of Examinations, Pune has not authorized or approved tests conducted by any other agencies for issue of certificates or award of scholarships and bears no responsibility whatsoever for them.

(R. V. Godhane)

**Commissioner,**

Maharashtra State Council

of Examinations, Pune-1.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) 2016-17

सन 2007-08 पासून राष्ट्रीय इ. 8 वी तील नियमित आणि आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ही एन. सी. ई. आर. टी., नवी दिल्ली यांचे मार्फत राबविली जात आहे. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे 12 वी पर्यंत शिक्षण पूर्ण व्हावे हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येईल.

सदर शिष्यवृत्ती 12 वी पर्यंत मिळते.

इ. 8 वी तील आर्थिक दुर्बल घटकातील ज्या पालकांचे उत्पन्न रु. 1,50,000/- पेक्षा कमी आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे सदर शिष्यवृत्तीचे वाटप होईल.

1. <u>शिष्यवृत्तीची रक्कम</u>:- एन्.सी.ई.आर्.टी./ मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली च्या नियमांना आधिन राहून प्रत्येक शिष्यवृत्ती -धारकास दरमहा रु. 500/- शिष्यवृत्ती देण्यात येईल.
2. <u>विद्यार्थ्यांची निवड</u>:- विद्यार्थ्यांची निवड परीक्षेमधून करण्यात येईल. संबंधित लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे व राज्याने निश्चित केलेल्या मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणानुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.
3. <u>महत्वाच्या तारखा</u>:- सन 2016-17 मध्ये इ. 8 वी मध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी आवेदन पत्र सादर करण्याच्या तसेच परीक्षेच्या तारखा खालील तपशीलाप्रमाणे असतील.

| परीक्षास्तर | राज्य / प्रदेश / विभाग | दिनांक |
|---|---|---|
| राज्यस्तर परीक्षा | अ) शाळेमार्फत नियमित आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याचा अंतिम दिनांक | दि. 31-08-2016 |
| | ब) शाळेने शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे आवेदनपत्राच्या प्रिंटआऊट व दाखले सादर करणे | शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे |
| | क) शाळेने विलंब शुल्कसहची आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याचा अंतिम दिनांक | दि. 30-09-2016 |
| | परीक्षा दिनांक महाराष्ट्र → | रविवार दि. 20-11-2016 |

आवेदनपत्रे शाळेमार्फत शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद / शिक्षण निरीक्षक, मुंबई यांचेकडे सादर करावीत. संबंधित अधिकारी याबाबत नियोजन करतील.

**4.** पात्रता :-

a) संबंधित राज्य / केंद्रशासित प्रदेशातील **शासनमान्य, अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतील इ. 8 वी तील नियमित विद्यार्थीच** राज्याने आयोजित केलेल्या NMMS परीक्षेसाठी पात्र असतील. विद्यार्थ्यास इ. 7 वी मध्ये 55% पेक्षा अधिक गुण असावेत (मागासवर्गीयांना 50%) गुण आवश्यक.

b) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे आई व वडील दोघांचे मिळून वार्षिक उत्पन्न रू. 1,50,000/- पेक्षा कमी आहे असे विद्यार्थीच या परीक्षेसाठी पात्र ठरतील. उत्पन्नाचा दाखला, तहसिलदार / सक्षम अधिकारी/ तलाठी यांच्या स्वाक्षरीने आवश्यक आहे.

c) **विनाअनुदानित शाळा, केंद्रीय विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी तसेच शासकीय वस्तीगृहाच्या सवलतीचा लाभ घेऊन शासकीय किंवा खाजगी शाळेत शिकणारे विद्यार्थी या परीक्षेसाठी अपात्र आहेत.**

**5. परीक्षा पध्दत:-** सन 2016-17 मध्ये इ. 8 वी मध्ये या वर्षी शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

सदर परीक्षेसाठी दोन विषय असतील

अ) मानसिक क्षमता कसोटी (GMAT)

ब) शालेय क्षमता कसोटी (SAT) - यामध्ये मूलभूत विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि गणित या विषयांचा समावेश असेल.

**6. शिष्यवत्ती संख्या:-** NMMS परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे MHRD नवी दिल्ली यांनी निश्चित केलेल्या कोटयानुसार व राज्याच्या संवर्गनिहाय आरक्षणानुसार, शिष्यवृत्त्या दिल्या जातील. राज्य आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे असेल.

1) SC - 13.00 2) ST- 07.00 3) VJ - 03.00 4) NTB - 02.50

5) NTC - 3.50 6) NTD - 2.00 7) OBC - 19.00 8) SBC - 02.00

अपंगासाठी प्रत्येक संवर्गात 3% आरक्षण असेल. प्रत्येक जिल्हयासाठीचा कोटा व विद्यार्थ्यांच्या जातसंवर्गाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्रदान करण्यात येतील.

7. <u>आवेदनपत्रांबाबत</u> :- महाराष्ट्रात सदर online आवेदनपत्रे भरण्यासाठी परिषदेच्या <u>www.mscepune.in</u> या संकेतस्थळावर प्रशालांना दि. 03/08/2016 पासून उपलब्ध होतील. आवश्यक SBI चलने परीक्षा परिषदेच्या वेबसाइटवरुन डाऊनलोड करता येईल.

शाळांनी विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांनी स्वाक्षरी केलेले ऑनलाईन आवेदनपत्राचे प्रिंटआऊट आवश्यक त्या जात, अपंग व उत्पन्न प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह तसेच 'S' फॉर्म आणि एकत्रित रकमेच्या SBI चलनासह दि. 31 ऑगस्ट, 2016 रोजी पर्यंत पूर्ण करुन संबंधित शिक्षणाधिकारी (माध्य.) / शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेकडे त्यांनी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या मुदतीत सादर करावयाची आहेत.

8. <u>शुल्क</u> :- महाराष्ट्र राज्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क रु. 100/- राहील. तसेच प्रत्येक शाळेसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी संस्था संलग्नता शुल्क रू. 200/- आहे.

9. <u>निकाल घोषित करणे</u> :-

परीक्षेचा निकाल जिल्हानिहाय व राज्याने निश्चित केलेल्या आरक्षणानुसार गुणवत्तेनुसार घोषित करण्यात येईल. अधिक माहितीसाठी कृपया जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, मुंबई (दक्षिण/पश्चिम/उत्तर) यांचेशी संपर्क साधावा.

<u>अनधिकृततेबाबत इशारा</u> -
एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे शिवाय महाराष्ट्रात अन्य कोणत्याही संस्थेस या प्रकारची परीक्षा / पूर्व परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे, शिष्यवृत्ती देणे या करिता प्राधिकृत करण्यात आलेले नाही. अशा संस्थाबाबतची कोणतीही जबाबदारी एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली /महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेवर राहणार नाही.

(रा. वि. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे 1.